।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## Office of the Controller of Examinations

Phone: (02462)229294 website: srtmun.ac.in E-mail: srtmuncoe@gmail.com
FAX No: (02462) 229520

संदर्भ: पनिका/सकेप्र-माहिती/२०१६-१७/१६६७ दि. १४.०२.२०१७

**परीक्षा प्राधान्य/तातडीचे**

प्रति,
**मा.प्राचार्य**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय :- सहकेंद्रप्रमुख व भरारी पथकासाठी शिक्षकांची नावे कळविणे बाबत.**

महोदय,

प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०१७ पदवी परीक्षा दि.१५.०३.२०१७ व द.२१.०३.२०१७ पासून सुरु होत आहेत. सदर परीक्षेसाठी सहकेंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील दोन अधिव्याख्यातांची नावे व भरारी पथक स्थापन करणेसाठी किमान तीन अनुभवी प्राध्यापकांची नावे परीक्षा विभागास coe@srtmun.ac.in या ई-मेलवर किंवा पोस्टाने दि.२५.०२.२०१७ पर्यंत न चुकता पाठविण्यात यावीत.आपण नामनिर्देशीत केलेल्या दोन्ही प्राध्यापकांना सहकेंद्रप्रमुख म्हणुन एकुण परीक्षेच्या कालावधीच्या अर्ध्या कालावधीसाठी नियुक्ती आदेश देण्यात येणार आहे. जेणेकरुन त्या प्राध्यापकांचे मुल्यांकनाचे, महाविदयालयीन व परीक्षा कार्यासाठी त्यांचा उपयोग करता यावे म्हणुन दोन नावे पाठवितांना विद्यापीठ संकेतस्थळावरील वेळापत्रकानुसार संबंधीत विषयाच्या शिक्षकांचा परीक्षा कालावधी तपासुन देण्यात यावे. तसेच याकामी आदेशप्राप्त शिक्षकांना तात्काळ कार्यमुक्त करावे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील नियम ३२(५)(ग) नुसार परीक्षेचे कामकाज बंधनकारक असल्याचे संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.

विद्यापीठ परीक्षा सुरळितपणे पार पाडण्यासाठी परीक्षा केंद्रावर सहकेंद्रप्रमुखांची नियुक्ती तसेच दक्षता पथक, भरारी पथक नियुक्त करण्यात येते. विद्यापीठाकडून संबंधितास आदेश दिल्यानंतर संबंधित शिक्षक हे काहीतरी सबब पुढे करुन यातुन सुट देण्याची मागणी करतात किंवा काही वेळेस संबंधित प्राचार्य या शिक्षकांना कार्यमुक्त करित नाहीत. यामुळे परीक्षा विभागाच्या कामात अडचण येते. हि बाब गंभीर आहे; असे प्रकार होवू नयेत तसेच महाविद्यालयाच्या कामकाजावर परिणाम होवू नये म्हणून दक्षता पथकाची व सहकेंद्रप्रमुखाची नियुक्ती करण्यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्याकडून शिक्षकांची नावे मागविण्याचा निर्णय झालेला आहे.

वरीलप्रमाणे ज्या महाविद्यालयाकडून शिक्षकांची नावे कळविण्यात येणार नाहीत, अशा महाविद्यालयातील शिक्षकांना परीक्षा विभागामार्फत आदेश देण्यात येतील व त्यांना कार्यमुक्त करणे बंधनकारक राहिल. कृपया याची नोंद घेवून परीक्षा सुरळित पार पाडणेसाठी सहकार्य करावे.

कळावे,

आपला,

**परीक्षा नियंत्रक**

**प्रत माहितीस्तव:-**

१. मा.कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा.प्र-कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.